SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 8 2 0 1 दि. 0 3 JAN 2026

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ :- क्रमांक- डी.टी.ई.एम-डी१७०टी.ई.क्यु.पी/२१२/२०२५-डी.ई.एस.के १७, दि.२२ डिसेंबर, २०२५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपूर येथील विधानभवनात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या समवेत संचालनालयातील प्रलंबित विषयांच्या अनुषंगाने चर्चा करण्याकरिता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी असे मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत. तेव्हा महाविद्यालय स्तरावर अभियंत्रिकी पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमामध्ये संदर्भिय पत्रातील विषयांचा समावेश करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी ही विनंती.

कळावे

आपला विश्वासू
PSPande
डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत :- संदर्भिय पत्र जोडले आहे.

E:\Nil\Parit Sir\Circular 2025.docx

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४९/४६६/४१९
ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : DTEM-D170TEQP/212/2025-DESK17 दिनांक : २२ डिसेंबर, २०२५

प्रति,
**मा. कुलगुरु,**
१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
१३) रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
१४) सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-
Inward No 5260
Date 29/12/2025

**विषय: मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ:** शासन पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.७७२/तांशि-४, दिनांक १९/१२/२०२५.

मा. महोदय,

मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपूर येथील विधानभवनात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या समवेत संचालनालयातील प्रलंबित विषयांच्या अनुषंगाने चर्चा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ततील खालील मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

NTW

| अ.क्र | इतिवृत्तातील मुद्या क्रमांक | विषय | मा. मंत्री महोदय यांचे निर्देश |
|---|---|---|---|
| १ | ६ | सोलार टेक्नॉलॉजीच्या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करणे. | सोलार टेक्नॉलॉजीचा वाढता वापर लक्षात घेता सोलार उपकरणे बसविणे, सोलार उपकरणांचे देखभाल व दुरुस्ती याकरिता लागणारे मनुष्यबळ राज्यात अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. अशा प्रकारचे कुशल मनुष्यबळ वाढविण्याकरिता "सोलार टेक्नॉलॉजी अॅन्ड मेंटेन्सस" हा अभ्यासक्रम पदवी व पदविका अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे निर्देश आहेत. |
| २ | ७ | पदवी/पदविका विद्यार्थ्यांकरिता जर्मनी/जपान/रशिया या | पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विदेशात नोकरीची संधी उपलब्ध होण्याकरिता संबंधित देशातील भाषेचे तसेच संस्कृतीचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. याकरिता जपान देशाच्या |

| अ.क्र | इतिवृत्तातील मुद्या क्रमांक | विषय | मा. मंत्री महोदय यांचे निर्देश |
|---|---|---|---|
| | | देशातील भाषाचे प्रशिक्षण | अभ्यासगटाने जपानी भाषेचे व संस्कृतीचे प्रशिक्षण देण्याचे मान्य केले असून, सदर प्रशिक्षणानंतर परीक्षा घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व नोकरीची संधी देण्यात मदत करण्याचे मान्य केले. त्याअनुषंगाने पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जर्मनी, जपान, रशिया या देशातील भाषांचे प्रशिक्षण देण्याच्या अनुषंगाने तात्काळ संबंधित अभ्यासगटांशी समन्वय साधून हे प्रशिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे निर्देश आहेत. |

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने येथे नमूद करण्यात येते की, सोलार टेक्नॉलॉजीचा वाढता वापर लक्षात घेता सोलार उपकरणांची उभारणी, देखभाल व दुरुस्ती यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या पार्श्वभूमीवर "सोलार टेक्नॉलॉजी अँन्ड मेंटेन्सस" हा अभ्यासक्रम पदवी व पदविका अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख तांत्रिक कौशल्ये प्राप्त होतील, सोलार प्रकल्पांची कार्यक्षमता वाढेल तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सदर अभ्यासक्रम नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील तांत्रिक गरजा पूर्ण करण्यास उपयुक्त ठरेल व देशाच्या शाश्वत ऊर्जा धोरणांना बळकटी देईल.

तसेच, पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जर्मनी, जपान व रशिया या देशांतील भाषांचे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. या देशांमध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मोठी मागणी असून स्थानिक भाषेचे मूलभूत ज्ञान असल्यास रोजगाराच्या संधी लक्षणीयरीत्या वाढतात. भाषा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कामकाज संस्कृतीशी जुळवून घेण्याची क्षमता, संवाद कौशल्ये व व्यावसायिक आत्मविश्वास वाढतो.

त्याअनुषंगाने, आपणांस विनंती करण्यात येते की, सर्व अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमांमध्ये वरील विषयांचा समावेश पदवी व पदविका अभ्यासक्रमात करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

**आपला,**

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत : माहितीसाठी.**

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

**प्रत : माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये, छत्रपती संभाजीनगर/नाशिक/नागपूर/अमरावती. त्यांना कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका तसेच स्वायत्त संस्थांना पत्रात नमूद विषयांशी संबंधित अभ्यासक्रम संस्थेत सुरू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही/ संबंधित विद्यापिठाकडे याबाबत पाठपुरावा करण्याबाबत सूचित करावे.

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई. त्यांना कळविण्यांत येते की, सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये वरील विषयांशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. कार्यासन क्रमांक २ व १०, मु.का., मुंबई